# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल: approval@unipune.ac.in

संदर्भ : सीसीओ/132

दिनांक : 04/02/2015

प्रति
मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये

मा. संचालक
सर्व मान्यताप्राप्त संस्था

विषय : संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांमध्ये कायमस्वरूपी नियुक्त केलेल्या शिक्षकांच्या परिवीक्षा कालावधीबाबत.

महोदय,

विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.३०.६.२०१० रोजी जारी केलेल्या UGC Regulations on Minimum Qualifications For Appointment of Teachers and Other Academic Staff in Universities and Colleges and Measures for the Maintenance of Standards in Higher Education, 2010 मधील परिच्छेद क्र. ११.१, ११.२ आणि ११.३ मध्ये शिक्षकांच्या परिवीक्षा कालावधीबाबतच्या नियमावलीचा उल्लेख खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

11.1 The minimum period of probation shall be one year extendable by a maximum period of one more year in case of unsatisfactory performance.

11.2 The confirmation at the end of one year shall be automatic, unless extended for another year by a specific order, before expiry of the first year.

11.3 Subject to this Clause 11, it is obligatory on the part of the university/the concerned institution to issue an order of confirmation to the incumbents within 45 days of completion of probationary period after due process of verification of satisfactory performance.

तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०११/(२५/११) विशि-१, दि.१५ फेब्रुवारी, २०११ अन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ३०.६.२०१०च्या नियुक्ती अधिसूचनेतील सदर बाब लागू करण्यात आली आहे. आतापर्यंत प्राप्त झालेल्या शिक्षक मान्यतेच्या प्रस्तावांतील शिक्षकांच्या नियुक्ती आदेशांचे अवलोकन केले असता, काही शिक्षकांच्या नियुक्ती दोन वर्षांच्या परिवीक्षा कालावधीवर केल्याचे आढळून आलेले आहे.

...२/-

उपरोक्त परिच्छेदमधील आशय स्वयंस्पष्ट असून या पुढे शिक्षकांच्या नियुक्तीस शिक्षक मान्यतेसाठी विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करताना शिक्षकांच्या नियुक्ती आदेशामध्ये एक वर्षाचा परिवीक्षा कालावधी नमूद केला असल्यासच विद्यापीठामार्फत शिक्षक मान्यतेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, जर एक वर्षाचा परिवीक्षा कालावधीचा उल्लेख नसल्यास त्याबाबत कोणताही स्वतंत्रपणे पत्रव्यवहार केला जाणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

उपकुलसचिव ४/२/१५
(शैक्षणिक विभाग)